PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Pak Pak Pakaak
Year: 2005

Song: Tuzh Lagin salu ki
Lyricist:

तुझं लगीन साळू की
बुळूबुळू वाळू
तुझं लगीन साळू की
बुळूबुळू वाळू
कुणा कुणाच्या पकडीत येईना
पोतभर दादले दारी तुझ्या आणिले
तरीबी लगीन तुझं होईना
ढिपांग वरात ढिडपांग बाजा
आम्हाला नाचता येईना
मनभर उखाने आवशीने वेचिले
पण लग्नाचंच नाव साळू घेईना
हे टिंग टांग टिंग
टिंग टांग टुंग
टिंग टांग टांग
टिंग टांग टिंग
टिंग टांग टुंग
टिंग टांग टांग
सांग सांग सांग साळू कानात हळूहळू
तुझ्या कपाळी कोण गोंदणार
कुणाच्या डोक्यावं वाटणार मिऱ्या गं
कुणाच्या दारी तू नांदणार

मला हवा असा सरदार
जरी ज्याचा देह पिळदार
दाढी मिशा जरी भरदार
तरी जो असे दिलदार
असे ज्याच्या नजरेला धार
एकाच नजरेत करील गार जो मला
होईन त्याची हो राणी मी
येईल जो चेतकावर स्वार
हर हर महादेव
हर हर महादेव

देवा रे देवा पावलास तू
मनाजोगा दादला दावलास तू
या या या या या
देवा रे देवा रागवलास तू
असा कसा दादला दावलास तू
केली तरी काय तुझी चोरी मी
कशापायी माझ्यावं कावलास तू
पादऱ्या पावट्या भाळायची नाय
मी त्या परीस लगीनच करायची नाय
तुझं लगीन साळू की
बुळूबुळू वाळू
कुणा कुणाच्या पकडीत येईना
आरं पोतभर दादले दारी तुझ्या आणिले
तरीबी लगीन तुझं होईना
ढिपांग वरात ढिडपांग बाजा
आम्हाला नाचता येईना
मनभर उखाने आवशीने वेचिले
पण लग्नाचंच नाव साळू घेईना
हे टिंग टांग टिंग
टिंग टांग टुंग
टिंग टांग टांग
टिंग टांग टिंग
टिंग टांग टुंग
टिंग टांग टांग
सांग सांग सांग साळू कानात हळूहळू

तुझ्या कपाळी कोण गोंदणार
कुणाच्या डोक्यावं वाटणार मिऱ्या गं
कुणाच्या दारी तू नांदणार

कष्टाची भाकर मिळवील जो
मला पिरमाचा तुकडा भरवील जो
कष्टाची भाकर मिळवील जो
मला पिरमाचा तुकडा भरवील जो
बनून माझं बुजगावनं
जिवानं माझी राखण करील जो

पिरतीची भेट करून बहाल
मला फुलावानी हळूवार ठेवील जो
देवा रे देवा पावलास तू
हिला मनाजोगा दादला दावलास तू
हैया हैया है
देवा रे देवा रागावलास तू
हिला असा कसा दादला दावलास तू
केली तरी काय तुझी चोरी मी
कशापायी माझ्यावं कावलास तू
मारक्या रेड्यावं भाळायची नाय
मी त्या परीस लगीनच करायची नाय
मी त्या परीस लगीनच करायची नाय

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*